# ऐतिहासिक निबंध



लेखकः विनायक दामोदर सावरकर

# ऐतिहासिक निबंध

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प समन्वयक: रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

# ऐतिहासिक निबंध

## १. सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण नि ते कां याची कारणे

रत्न म्हटले की ते टाकाउ असे नसावयाचेच; परंतु त्यातल्या त्यात कोहिनूरची दीप्ती जशी काही निराळीच; किंवा देव म्हटले की सर्व वंद्य, पण त्यांतही, त्याचप्रमाणे ज्यांनी प्रथम मोडकळीस आलेल्या स्वातंत्र्यप्रासादाचा जीर्णोद्वार केला ते बाळाजी विश्वनाथ, ज्यांनी आपल्या बाहुबलाने नि सद्गुरूप्रसादाने सत्कीर्तीचे मजले त्या प्रासादावर उठविले ते बाजीराव - चिमणाजी नि ज्यांनी आपल्या पितृपितामहांच्या अचाट धाडसाला नि कीर्तीला साजेल अशा रीतीने कैक शत्रूंस दाती तृण धरावयास लावून त्या विस्तीर्ण नि भव्य प्रासादाची पूर्णता करून त्यावर हिंदुपदपादशाहीचा देदीप्यमान जरीपटका रोविला ते बाळाजी-मालिकेत कौस्तुभमणीच्या ठायी शोभणार्‍या माधवरावांची थोरवी काही विलक्षणचा ! जमीन कितीही जरी सुपीक असली, तरी काही काळाने जशी ती निःसत्त्व होत जाते त्याचप्रमाणे भटकुलभूमिकेने माधवरावांना जन्म दिल्यापासून ती निःसत्त्व होत गेलीसे दिसते. कारण त्यांच्यामागून जेवढे पेशवे गादीवर आले, तेवढयात एखादाही माधवरावापर्यंतच्या पेशव्यांसमान झाला नाही; मग त्यास कारण भोवतालची परिस्थिती असो, वा अंगच्या अमोल गुणांची कसोटी पाहण्यास त्यांची त्यांच्यापूर्वीच्या पेशव्यांशीच तुलना केली पाहिजे नि त्यांत जर ते श्रेष्ठ ठरले तर ते सर्व पेशव्यांत थोर होते हेही कबूल केले पाहिजे.

आता हेही खरे आहे की, प्रसंग हा मानवी प्राण्यांच्या गुणसिंधूला भरते आणणारा चंद्र होय. प्रसंगाशिवाय मनुष्याच्या अंगचे गुण वनात सुकलेल्या गुलाबाच्या पुष्पाप्रमाणे होत. माधवरावांच्या अंगी जे जे गुण वास करीत असलेले आपणास दिसतात. ते ते पूर्वीच्या पेशव्यांच्या अंगी नसतील असे नाही नि त्याच कारणांनी त्यांच्या त्या अद्दश्य गुणांची आपल्याला कल्पना होणे नाही. माधवराव गादीवर आले त्या वेळची संकटपरंपरा नि अत्यंत दुस्तर परिस्थिती नि त्यातून माधवराव निभले ही गोष्ट, ह्या दोन गोष्टी ऐकताच त्यांच्या अजब कर्तृत्वशक्तीने मनुष्य थक्क होतो! 'व्यावर्तितातपरूजः प्रथमाभ्रवृष्टया वृक्षस्य वैद्युत अवग्रिरिव स्थितोऽयम्।'

याप्रमाणे हिंदुपदपदशाहीची पानपतच्या भयंकर रणकन्दनामध्ये दुर्दशा झाली आहे. दोन लाख बांगडी फुटल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून अबलांच्या हृदयद्रावक किंकाळया नि वृध्द मातापितरांचे हंबरडे एकू येताहेत; स्वराज्यप्रसादाचे स्तंभ जे सरदार लोक, ते खाल्ल्या घरचे वासे मोजू लागले आहेत; नुकताच उद्‌गीरच्या लढाईत बडविलेला निजाम, म्हेसूरच्या हैदर, रोहिलखंडचा नजीब, अयोध्येचा नबाब असे एक ना अनेक कोल्हे क्षणभर क्षीण झालेल्या मराठी सिंहास मृतप्राय मानून त्याच्या मांसाची वाटणी करण्यास उद्‌युक्त झाले आहेत; एका दोन महिन्यांत स्वकुलगृहाचे तीन आधारस्तंभ पडल्याने वरची इमारत डळमळू लागली आहे; आजपर्यंत कोणत्याही पेशव्याला अननुभूत असा फितून राहू महाराष्ट्रराज्येंदूला ग्रासू पाहत आहे नि होळकर, भोसले, बुंदेले अत्यादी कृतघ्न सरदार ज्यांचे अन्न खाल्ले त्याची अशी स्थिती असता खुशाल तमाशा पाहत उभे आहेत नि आपापली तुंबडी कशी भरते या आपस्वार्थी चिंतेत निमग्न आहेत- अशा अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी १७ वर्षीचे पोर, की ज्या वयात आमच राजबिंडा माधव, प्रपितामहांनी संपादन केलेल्या नि पितृपितामहांनी असह्य तोल संभाळण्यास दंड ठोकून उभा तो काय राहतो नि कविकुलमुकटमणीच्या

**भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुं**

**न खलु वयसा जात्यैवायं स्कार्यसहोभरः।**

ह्या वचनास यथार्थ करून एका दहा वर्षात झंझावाताप्रमाणे वरील अभ्रपटल पार विध्वंसून टाकून महाराष्ट्रस्वराज्याकाश निर्मल ते काय करतो!! खरोखर असल्या प्रसंगी जर थोरले माधवरावांविरहित कोणताही पेशवा गादीवर असता तर त्याला इतक्या बेमालूम रीतीने ही सर्व संधाने साधणे अशक्य होते! कारण माधवरावांच्या वेळेला इतकी कठीण परिस्थिती आली होती की, ती पूर्वी कोणत्याच पेशव्याच्या वाटयास आली नव्हती. शिवाय माधवरावांपेक्षा पूर्वीच्या तिघाही पेशव्यांना पुष्काळ अधिक सवलती होत्या. बाळाजी विश्वनाथाला जसा शाहूमहाराजांचा जबर पाठपुरावा होता तसा माधवरावांना कोणाचाच नव्हता. शिवाय बाळाजी विश्वनाथांपेक्षा राज्यशकटपालन माधवरावांच वेळेस किती पट तरी दुस्तर झालेले होते, हे वरील वर्णनवरून दिसेलच. बाजीरांवाशी तुलना करू लागले असताही असे आढळून येईल की, त्यांच्यापेक्षा जास्त जबाबदारीची कामे माधवरावांस पार पाडावी लागली. त्यांस एक तर चिमणाजी अप्पासारखा कोणी जोडीदार सहकारी नव्हता. शिवाय शिंदे - होळकरादी सरदारांची प्रस्थे बाजीरावाच्या वेळेस

बिलकूलच डोईजड नव्हती नि इतकी कृतघ्नही बनली नव्हती. बाजीरावाला मोठा नि कायमचा शत्रू म्हटला नव्हती. बाजीरावाला मोठा नि कायमच शत्रू म्हटला म्हणजे काय तो एकटा निजाम, पण हैदर नि अंग्रज, रोहिले, रजपूतही होते! सारांश, हिंदुस्थानी सर्व राजे पेशवाईच्या नाशाकरिता 'व्रणात पशुच्या शिरावरि वनी उभे काकसे' राहिले होते! बाजीरावाला कर्जाचा जाच सोसावा लागला तर तो आमच्या माधवरावांनाही सुटला असे नाही! अशा रीतीने बाजीरावापेक्षा खडतर स्थितीत सापडूनही ज्यांनी खच्ची झालेल्या राज्यवृक्षाचा जोम 'की तोडिला तरू फुटे आणखी भराने' ह्या न्यायाने वृद्‌धिंगत केला त्यांची थोरवी काय वर्णन करावी? आपल्या नातवाचे हे अवर्णनीय चातुर्थ पाहून त्या पितामहांनी मात्सर्यरहित होउन स्वर्गी आश्चर्याने तोंडात बोटच घातले असेल! आता नानासाहेबांसंबंधाने पाहिले तर त्यांना शत्रू, चतुर नि कारस्थानी अशा भाउ-दादांचे साहृय होते; सर्व सरदार लोक आपापल्या इमानास जागत होते; 'विभवयशाचे सदैव पोशिंदे' असे तुकोजी, दत्ताजी नि जनकोजी शिंदे नि 'रिपुंसि महादर देते' राजेबहाद्दर नि समशेरबहाद्दर असलेला एकेक वीर हातावर शिर घेउन उच्चारलेला शब्द सिध्दीस नेण्यास खडे होते नि छत्रपतींच्या वेळपासून मराठयांचा बसलेला अद्भूत दरारा कायम होता! शिवाय घरात फितुराने पोखरण्यास आरंभ केला नव्हता. पण ह्या सवलतींपैकी एक तरी सवलत रावसाहेबांस मिळाली काय? नाही, अगदी नाही! सर्व प्रकार याच्या अगदी उलटा पण त्या पठ्ठयाने या संकटास भीक घातली काय? बिलकूलच नाही. त्यांनी भ्रातृपितृ पितृव्यशोकाचे असह्य उमाळे दाबून टाकून काकांचा शक्य तिथवर बोज ठेवला नि तोच त्यांचा क्रम जेव्हा मर्यादातिक्रम करू लागला त्या वेळेस कोणाच्याही आधाराची वा दपटशहाची पर्वा न करता सामदंडादी साधनाने योग्य शासन देउन आधी घरातील कलह मिटविला; 'सख्या विठ्ठलाच्या' जगप्रसिध्द शहाणपणाला बिल्ली मांजर बनविले; राक्षसभुवनच्या लढाईत स्वतःच्या शौर्याची नि कर्तबगारीची कमाल करून निजामाची हड्डी नरम केली; रजपुतांना वठणीवर आणले नि शिवाय दिल्ली बहुतेक हाताखाली घातली ती निराळीच! सारांश, भयंकर वादळाच्या तडाख्यात गवसलेल्या नि समोरील खडकावर आपटून छिन्नविछिन्न होण्याच्या बेतात आलेल्या तारवास जसा एखादा कुशल कर्णधार मिळावा नि त्याने त्यास अलगत तीरास न्यावे, त्याचप्रमाणे मोठया शिताफीने माधवरावाने स्वराज्यास त्या वेळेस जगविले!

ही नुसती राजकीय गोष्टीत तुलना झाली. पण प्रजावात्सल्य, मनुष्याची पारख, अभ्रत, शौर्य, कारस्थानीपणा वगैरे जे जे काही म्हणून राजाला अवश्य पाहिजे ते ते माधवरावांच्या अंगी एकवटले होते! माधवरावांच्या अंगी बाळाजी विश्वनाथाप्रमाणे नि बाळाजी बाजीरावाप्रमाणे

कारस्थानपटुत्व होते; बाजीरावाप्रमाणे शूरत्व नि धाडस हते; शिवाय मनुष्याची पारख करण्याच्या कामात तर त्यांची कमाल होती! तसल्या अल्पवयात जी जी मनष्य त्यांनी निवडली त्यात एकही टाकाउ निघाला नाही! नाना फडणीस, रामशास्त्री, महादजी शिंदे, त्रिंबकराव मामा पेठे अत्यादी त्यांची मंडळी यच्चयावत आपापल्या सद्गुणतेराशीने भारतेतिहासात लखाखत आहेत! त्सेच प्रजावात्सल्याच्या कामी ते किती दक्ष असत, हे बिगारी धरण्याची त्यांनी बंदी केली ह्या गोष्टीवरूनही दिसून येईल. सारांश, पूर्वीच्या सर्व पेशव्यांचे गुण पुष्कळ पटीने गुणीभूत होउन माधवरावांच्या अंगात एकवटले होते नि म्हणूनच ते म्हणजे श्रीमंत माधवराव बल्लाळ उर्फ थोरले रावसाहेब पेशवे, हे सर्व पेशव्यांत अतिथोर होत. इतकेच नव्हे तर, जगात आजवर जे कोणी नामांकित राजे होउन गेले त्यांच्या मालेच्या मध्यभागी आमच्या ह्या भारतीय रत्नाला गुंफण्यास बिलकूल हरकत नाही.

-करमणूक, २८-१२-१९००

# २. ऐतिहासिक पुरूषांचे उत्सव कां करावे?

विश्व हे अवाढव्य कुटुंब आहे नि परमेश्वर हा ह्या कुटुंबाची कार्यधुरा धारण करणारा अक्षय, अनंत नि सर्वशक्तिमान धुरीण आहे. ह्या कुटुंबात समाविष्ट झालेल्या असंख्य कौटुंबिकांचा योगक्षेम सुरळीत चालावा, त्यांच्याकडून घडलेल्या कृत्यांचे बारीक रीतीने निरीक्षण करून त्यात जी जी सत्कृत्ये असतील त्यांस नि त्यांच्या कर्त्यांस उत्तेजन द्यावे नि जी जी दुष्कृत्ये असतील ती ती पुन्हा न घडतील असा बंदोबस्त करावा, त्या सर्वांनी एकमेकांशी ईश्वरदत्त नीतीने अतिक्रम न करता प्रेमाने वागावे नि हे कुटुंब न्याय, पुण्य नि आंनद ह्यांचे माहेरघर बनावे याबद्दल तो विश्वसृट् परमेश्वर नेहमी तत्पर झालेला असतो. आपल्या असंख्य कौटुंबिकांपैकी स्वभावसादश्यानुरूप तो निरनिराळे वर्ग करतो नि त्या प्रत्येक वर्गास तत्तद्रुचिसादश्याच्या अनुरोधाने तो वर्तनाचे उत्तम नियम घालून देतो. ह्या वर्तन-नियमांस धर्मपंथ म्हणतात. ज्याप्रमाणे तो नियमांचे हे वर्गीकरण करतो त्याचप्रमाणे ह्या नियमांस नि ज्या वर्गासाठी ते नियम केलेले असतात त्या वर्गास अनुकूल नि अवश्य अशी एखादी स्वतंत्र खोली तो आपल्या विश्वरूपी विस्तीर्ण पाण्याचे जसे नळ आणलेले असतात त्याप्रमाणे तोही त्या खोलीत मोठमोठया नद्या आणून पाण्याची उत्कृष्ट सोय करतो. त्याच्या आहारास अवश्य तेवढे खाद्य देईल असे धान्याचे कोठारही जमिनीच्या रूपाने तेथे तयार केलेले असते. दुसऱ्या कोणी ह्या खोलीस उपरोध करू नये नि सीमेसंबंधाने घोटाळा उडू नये म्हणून ह्या खोल्यांभोवती तो परमेश्वर पर्वतांच्या भिंती घालतो नि ह्या सर्व कौटुंबिकांचे दळणवळण कायम राहावे म्हणून त्या पर्वतांच्या भिंतीना खिंडीच्या रूपाने मोठमोठी दारे ठेवतो. अशा या निरनिराळया खोल्यांना व्यावहारिक भाषेमध्ये देश अशी संज्ञा आहे. या निसर्गविरचित खोल्यांमध्ये जेथे ज्यांची योजना असेल तेथे नि तेवढयातच त्यांनी सुखासमाधानाने राहावेअशी त्या परमजनकाची आज्ञा असते. सर्वांचे कल्याण सारखेच करण्याची त्याची इच्छा असल्याने वरील निवडणुकीत त्याजकडून यत्किंचितही पक्षपात झालेला नसतो. पण हे त्याचे निःपक्षपातित्व कित्येक अदूरदर्शी मूर्ख लोकांस न कळून ते महत्वाकांक्षेच्या फेऱ्यास सापडतात. त्यांस जी खोली परमेश्वराने दिलेली असते तिने त्यांची तृप्तता होत नाही. त्यांस दुसऱ्यांच्या खोल्या हिसकावून घेण्याची अपहारबुध्दी उत्पन्न होते नि 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायाने हे दुष्टबुध्दी स्वजातीयांवरच हल्ला करून त्यांना आपल्या कब्जात आणतात. मग आपले वर्तन-नियमच सर्वोत्कृष्ट अशी चुकीची समजूत करून घेउन ते त्या जित लोकांनी पाळावेत असा जुलूम करू लागतात. अशा रीतीने त्या सर्वश७मानाच्या इच्छेविरूध्द नि मानवी जातीच्या

कल्याणाविरूध्द जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रकारचा घोटाळा उडतो नि विश्वकुटुंबाची व्यवस्था डळमळते तेव्हा तेव्हा तो घोटाळा मोडून टाकून न्यायाचा विजय करून 'अधमासी मारोनी सुजना ताराया' तो जगत्पालक निरनिराळया अंशांनी, निरनिराळया विभूतींच्या ठायी द्दग्गोचर होतो नि त्यांच्याकडून ती ती उद्दिष्ट महत्कार्ये घडवून आणतो. ह्याच विभूतींना परमेश्वराचे अंशभूत म्हणून कोणी अवतारी किंवा दैविक पुरूष म्हणतात किंवा त्यांच्या महत्कृत्यांनीच इतिहास उत्पन्न होत असल्याने कोणी त्यांस ऐतिहासिक पुरूष म्हणतात.

असल्या सत्पुरूषांचे हे त्यांच्या स्वतःसाठी नसते. ते 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' असतात. त्यांच्या ठायी ईश्वरी अंशाचा संभव असल्याने त्यांचे सर्व काही आपणा सामान्य जनांहून उच्चतर असते. त्यांचे हात स्वोदरपूर्तीस्वतच नसून अन्यायास रट्टे देउन न्यायास कुरवाळण्यासाठी असतात. त्यांची दृष्टी स्वहित पाहण्यासाठीच नसून सर्व जगाच्य कल्याणाकडे तिचा रोख असतो. फार काय पण 'भवो हि लोकाभ्युदयाय ताद्दशां' अशी त्यांची थोरवी असल्याने त्यांचे वैभव सामान्य मतीला एकदम ग्रहण करिता येतं नाही. त्यंचे पराक्रम अशक्य भासतात नि त्यांच्या कृत्यांची वर्णने कादंबऱ्या वाटतात. उघडच आहे. एखाद्या कूपदर्दुराला जर 'अगाध-जल-संचारी' देवमाशाचे वर्णन सांगितले तर त्यास ते शक्य कसे वाटावे? गावाखालील ओहळालाच ज्याने पाहिले आहे त्यास समुद्राची नेउन त्यास उभा केला तरी स्वतःच्या दृष्टीवर पूर्ण विश्‍वास ठेवून आपण पाहत आहोत हे सत्य आहे अशी त्याची खात्री कशी व्हावी? तद्वतच स्वार्थपरायण, महत्त्वकांक्षी नि नीचहेतू अशा आपणा सामान्य जनांस त्या परार्थंसाधू, निरपेक्ष नि उच्चहेतू अशा ईश्वरी विभूतींच्या महत्वाचे एकदम मापन करणे हे अगदी असंभवनीय आहे.

परंतु अशा थोर विभूतींच्या महत्त्वाचे मापन करणे जरी अशक्य असले तथापि त्यांनी केलेल्या कृत्यांचे महत्त्वमापन करणे सामान्य जनांसही शक्य होते. श्रीरामचंद्राचे पराक्रम जरी प्रत्यक्ष कोणास करता येणारे नाहीत, तथापि त्यांनी केलेल्या रक्षःक्षयाने वसुंधरा हतभार झाली हे सर्वास आकलन करता येते नि आदिकवींची 'सरसा सालंकरा सुपदन्यासा सुवर्णमयमूर्ति' अशी वाणी जरी साध्य होणे अशक्य असले, तथापि त्या वाणीने विरचित झालेल्या रामायणाने जगत्त्रयावर केवढा अपुकार केला आहे हे सर्वांस समजते. सारांश, थोर लोकांची कृत्ये करण्यास जरी सामान्य जन असमर्थ असतात तरी त्या कृत्यांची नि त्यांची सुपरिणामांची थोरवी त्यांस कळते नि त्या योगानेच ते लोक त्या ईश्वरी तेजापासून संभूत झालेल्या विभूतीवर फार प्रेम ठेवतात.

ज्यावर आपले प्रेम असते, त्या सबंधी साहजिक रीतीने आपल्या मनात एक प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न होतो. ज्या मानाने ते प्रेम मोठे त्या मानाने तो पूज्यभावही मोठा असतो. अवतारी पुरूषांची कृत्ये विश्वकल्याणास्तव असल्यामुळे त्यांवर जगताचे विशेष प्रेम बसते नि ते एकसारखे वृध्दिंगत होत असते. ते प्रथम त्या सत्पुरूषाला अवतारी समजतात, पण पुढे तर प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूपी मानतात. त्यांनी ज्या मानाने जगास उफत केलेले असेल त्या मानाने त्यांच्यावर सामान्य जनसमूह प्रेम नि अर्थात पूज्यभाव ठेवतो. त्या सत्पुरूषांच्या परोपकारी कृत्यांनी त्यांची अंतःकरणे आर्द्र होतात. ते त्या थोरांची कृत्ये जगाला कशी फायदेशीर झाली हे सांगू लागतात. पूज्यभावाने त्यांची नामस्मरणे करतात. ज्या ज्या ठिकाणी नि ज्या ज्या रस्त्यांनी ते सत्पुरूष गेलेले असतील ती ती सारी स्थळे क्षेत्रे होतात. ज्या नद्यांचे ते पाणी प्यायले असतील त्या नद्या परम पवित्र मानल्या जातात नि ज्या दिवशी त्यांचे जन्म किंवा निधन झाले असेल त्या दिवशी त्यांनी केलेल्या उपकारी कृत्यांची आठवण होउन जनसमूहाची हृदये प्रेमरसाने भरून येतात! त्या त्यांच्या अमर्यादित अपुकारांची यत्किंचित तरी फेड व्हावी म्हणून त्यांचे पूजन केले जाते, त्यांचे भजन केले जाते, त्यांचा जयजयकार होतो नि त्यांच्या परम पवित्र कृत्यांची गुणवर्णने गात गात सकल जनसमूह त्यांच्या ठायी तल्लीन होउन जातो! त्या औतिहासिक सत्पुरूषांचे उत्सव करू लागतो!!

ऐतिहासिक उत्सवांचे महत्त्व ध्यानात यावयास नि ते कां करावे हे पूर्णपणे जाणण्यास या उत्सवाची ही उत्पत्ती ध्यानात ठेवली पाहिजे. आपणांवर एखाद्याने उपकार केला असता त्याच्या उपकाराची फेड यथाशक्ती करावी किंवा निदान त्या त्याच्या कृतीबद्दल त्याचे अखंड आभारी तरी व्हावे हा मनुष्यजातीचा निसर्गजन्य धर्म होय नि उपकारकर्त्याशी कृतघ्न न होता कृतज्ञ राहावे हे नीतीशास्त्राचे सार होय. याच मानवी धर्माला अनुसरून नि याच नीतीशास्त्राच्या अनुरोधाने थोर सत्पुरूषांचे उत्सव करण्याची ही चाल पडली आहे किंवा पाडली आहे म्हणण्यापेक्षा पडली आहे म्हणजेच जास्त योग्य होय! क्ारण मानवी धर्माला धरून ज्या चाली असतात त्या पाडाव्या लगत नाहीत. त्या चालींची उत्पत्तीही मानवी धर्माप्रमाणेच निसर्गजन्याच असते. एखाद्याने आपल्यावर उपकार केला म्हणजे त्याच्याबद्दल कृतज्ञता जशी आपोआपच जागृत होते नि तिची जागृती व्हावी म्हणून जशी व्याख्याने झोडावी लागत नाहीत तद्वतच ज्यांनी आर्यधर्मास ग्लानी आली असताना नास्तिकांच्या धांगडधिंग्यास आळा घालून आपल्या नास्तिकांच्यां धांगडधिंग्यास आळा घालून आपल्या सर्वसामर्थ वाणीने परपक्षीयांस दीनवाणी केले नि धर्माचे संस्थापन केले

त्या शंकराचार्यांचे, ज्यांनी सर्व देश पारतंत्र्याच्या वणव्यात होरपळत - नव्हे-जळत असता आपल्या समशेरीच्या पाण्याने त्या वणव्यास विझवून वर स्वातंत्र्यामृताची वृष्टी करविली त्या छत्रपतींचे, ज्यांनी महाप्रयासाने उभरलेला स्वातंत्र्यप्रासाद आमूलाग्र डळमळत असताना केवळ आपल्याच बुध्दीच्या नि लेखणीच्या टोकावर त्यास थोपवून धरून गोकुळात श्रीकृष्णाने एका करांगुलीवर गोवर्धन कसा धारण केला हे सर्व जगाच्या प्रत्ययाला आणून दिले त्या फडणीसांचे नि तत्सदृश ईश्वरी-अंशभूत थोर सत्पुरूषांचे उत्सव करण्याची चाल ही पाडवयास नको आहे! त्यांचे उत्सव हे लोकांच्या मनोमंदिरात अक्षय चाललेले असतात, सद्सद्विवकेबुध्दीची त्यांच्या महत्त्वकथनाची व्याख्याने तेथे अखंड सुरू असतात! कृतज्ञता आपल्या हाती नीरांजन घेउन त्यांच्या अगणित सत्कृत्यांवर ‘सूर्यबिंब लाजेल जयाला’ असा प्रकाश सतत पाडीत असते! त्यांचे हे उत्सव स्वयंभू असतात. इतकेच नव्हे तर एकदा का ते सुरू झाले म्हणजे मग ते कोणाच्यानेही बंद करवत नाहीत. जेव्हा सद्गुणांनी किंमत मनुष्यजातीस कळू लागली तेव्हापासून हे उत्सव सुरू झालेले आहेत. जोपर्यंत सद्गुणांची ही किंमत मनुष्याजाती विसरणार नाही तोपर्यंत हे उत्सव अबाधित नि अखंड चालावयाचे आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे जगाच्या उत्पत्तीबरोबर हे उत्पन्न झाले आहेत नि जगाच्या अंतापर्यंत हे अनंत राहणार आहेत.

सारांश, हे ऐतिहासिक उत्सव अनादिकालापासून चालत आलेले असून त्यांची उत्पत्ती ही मानवी स्वभावास अनुसरून असणारी जी कृतज्ञताबुध्दी तिच्यापासून झालेली आहे. मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच असल्याने कृतज्ञताबुध्दीपासून उद्भूत झालेली ही ऐतिहासिक उत्सव करण्याची चाल ह्या जगतीलावरील झाडून साऱ्या राष्ट्रांत थोडयाबहुत अंशाने प्रचलित असतेच. ते करण्याच्या पध्दतीत कालस्थित्यनुरूप भेद नाही. श्रीरामचंद्राने दुष्ट राक्षसांचा संहार करून यज्ञयागादिकांस निर्विध्नता, ऋषिजनांस अभयता नि सर्व धरित्रीस निर्भयता दिली म्हणून कृतज्ञ होउन आम्ही रमजयंतीचा उत्सव करतो. तर प्रत्यक्ष सुळावरूनही तारण्यास समर्थ असा उपदेश केला म्हणून कृतज्ञ  होउन ख्रिस्ती लोक ख्रिस्तजयंतीचा उत्सव करतात. पारतंत्र्याने बध्दीभूत झालेली आर्यभूमी सुलतानी तरवारीच्या धारेवर त्या सुलतानाच्या मानेच्या तालाबरहुकूम नाचत असताना नि क्षणोक्षणी पाय चुकून किंवा जोराने पडून तिच्या सुरम्य शरीराचे तुकडे तुकडे होतात की काय, अशी भीती पडली असताना आपल्या महाराष्ट्रीय भाल्याने त्या तरवारीला अचूक उडवून त्या आर्यभूमीला अलगत मुक्त करणाऱ्या छत्रपतींचे, त्यांच्या या अनन्य-सामान्य कृतीने कृतज्ञ होउन आम्ही उत्सव करतो, तर राबर्ट ब्रूसचे स्कॉटलंडातील लोक कृतज्ञताबध्दिपूर्वक उत्सव

करतात! मुसलमान लोक पैगंबराचा उत्सव करतात, ग्रीसचे लोक लिऑनिडॉसचा करतात, अमेरिकन लोक वॉशिंग्टनचा करतात नि अटलीचे लोक ग्यारिबॉल्डीचा करतात. पहिले आपणांस मर्दान दिले म्हणून, दुसरे आपल्यासाठी प्राण दिला म्हणून नि बाकीचे आपणांस पारतंत्र्यशृखलेतून मु७ केले म्हणून त्या त्या व्यक्तीबद्दल कृतज्ञ होउन त्यांचे उत्सव करू लागतात! आम्ही उत्सवात कथा करू तर अंग्रज लोक व्याख्याने देतील नि मुसलमान भफदार पोशाख नि दिखाऊ रोषणाई करून त्यांचे उत्सव साजरे करतील. परंतु त्या साऱ्या उत्सवांची कृतज्ञता हीच जननी होय! रूपे निरनिराळी असतील, पण हेतू मात्र एकच.

परंतु हेतूची सिध्दता ही पुष्कळ अंशी रूपावरच अवलंबून असते. कालस्थिती नि परिस्थितीप्रमाणे ही रूपे बदललीच पाहिजेत. लोकाभिरूची ही जशी पालटेल तशी, हेतूच्या सिध्दतेला जास्त बळकटी ज्या ज्या दिशेने येण्याच संभव असेल तशी तशी नि त्या त्या दिशेने ह्या रूपांमध्ये होत असताना सामान्य जनसमूह एकदम थोडासा चकित झाल्यास नवल नाही. कथेची संस्कृत पध्दती किंचित ढिली होउन जेव्हा भजनपध्दती सुरू झाली नि पायांत घुंगरे घालून नि एका हातात वीणा नि एकात चिपळया घेउन 'तुझे नामी प्रेम देई अखंडित। नेणे तप व्रत दान काही।।' असा करूणारव फोडीत तुकोबा पंढरीरायांच्या समोर 'ब्रह्यानंदी लागली टाळी। कोण देहातें सांभाळी।। अशा स्थितीमध्ये जेव्हा प्रथम दिसू लागले तेव्हा त्या त्यांच्या करूणरवाबरोबर जरी लोकांची अंतःकरणे त्यांस न जुमानता प्रेमरसाने विरघळत जात नि त्यांची नयने त्या 'वैराग्यें डोलविला, माथ जेणे मुनींद्र सनकाचा।' अशा भगवद्धभक्तांस पाहून भक्तीरसाच्या अश्रूंनी भरून येत, तथापि फक्त परंपरागत संस्काराने त्या पध्दतीस उघड रीतीने तत्कालीन समाजास अनुमोदन देता येईना! इतके लांब कशाला! श्रीगणपत्युत्सवाला राष्ट्रीय वळण देउन त्यात जेव्हा मेळयाची नवीन पध्दती सुरू झाला हे अजून प्रत्येकाला स्मरत असेल! पण मजा काय की, ते प्रतिपक्षी तोंडाने मेळयांस शिव्या देत असतानाच त्यात नाचावयास प्रवृत्त झाले नि ही पध्दती हानिकारक आहे हे सिध्द करण्यासाठी त्याच्या बाजूचे म्हणून पुरावे मांडीत असतानाच त्या पध्दतीची उपयुक्तता सिध्द करू लागले!! दुष्यंताने शापमूढ स्थितीमध्ये शकुंतलेचे रमणीय रूप पाहताच त्याची जी अवस्था झाली तीच अवस्था मनोहर पण नवीन रूपे पाहून सामान्य समाजाची होते नि 'न च खलु परिभोक्तं नापि शवनोमि हातुम्' अशा विलक्षण बुचकळयात पडून तो समाज भांबावून जातो!!

परंतु अशा भांबावून गेलेल्या समाजास त्याचा भास दूर करून खरा प्रकार खऱ्या रीतीने कळविणे हे समाजधुरीणांचे आद्यकर्तव्य होय. समाजास आजपर्यंतच्या पध्दतीप्रमाणे पुराण, कथा, भजन वगैरे प्रकारच उत्सवात असतात असे वाटणे साहजिक आहे नि जेव्हा पुराणांच्या ऐवजी कोणी व्याख्यान देउ लागेल तेव्हा तो एक प्रकारचा विलक्षणा होता आहे असे वाटून त्यास चुकल्यासारखे होईल, फार काय, पण समाजाच्या ओळखीचे 'दैविक पुरूष' हे नाव घातले असताही समाजास ते नवीन वाटेल. पण त्यास नीट समजाविले पाहिजे की, ऐतिहासिक पुरूषांचे उत्सव हे काही नवीन नाहीत. ज्यानी तुम्ही दैविक म्हणत होतात त्यांनाच आम्ही ऐतिहासिक हे जास्त व्यापक नाव देतो. हे आपलेच आहे, हे परकीयांपासून उसनवार घेतलेले नाही. श्रीरामाचे उत्सव काय आपण आज करू लागलो आहोत? आळंदीची यात्रा काय यंदाच भरू लागली आहे? नि जर या सर्व गोष्टी पूर्वापार चालत आल्या आहेत तर मग ऐतिहासिक पुरूषांच्या उत्सवांची चाल नवीन कशाने झाली? का हे सर्व प्रकार ऐतिहासिकच नव्हते? श्रीरामाने रावणाचा नाश करून कित्येक राष्ट्रे स्वतंत्र केली; श्रीकृष्णाने सत्पक्ष स्वीकारून पानिपतच्या रणभूमीवर अन्यायी नि अपहारी कौरवांच नाश केला नि ज्ञानरायांनी 'श्रीमद्वगवद्गीता व्याख्या केली जनांसि ताराया।' ह्या गोष्टी ऐतिहासिक नाहीत काय? इतिहास ह्याच गोष्टींनी झाला नाही काय? नि जर यांनी झाला नाही तर झाला तरी कशांनी? व्यर्थ नामभेदांनी फसण्याचे कारण नाही. दैविक पुरूषांचे उत्सव हे निराळे नसून ते ऐतिहासिक पुरूषांच्या उत्सवांतच अंतर्भूत आहेत नि ज्या अर्थी ऐतिहासिक उत्सवांची चालही पूर्वीचीच आहे. श्रीरामाने आपणावर उपकार केला. त्याचे आम्ही कृतज्ञ झालो नि त्याचे उत्सव करू लागलो. श्रीशिवराजानेही आपणावर उपकार केले आहेत. अर्थात आपण त्याचे कृतज्ञ झाले पाहिजे नि त्यांचे उत्सव केले पाहिजेत. कोणी म्हणतात की, अशा दृष्टीने पाहिजे तर आपणा हिंदुस्थानवासीयांस शेकडो उत्सव दररोज करावे लागतील तितके हवेच आहेत. असले उत्सव करावे लागणे ही सामान्य गोष्ट नाही; ही असामान्य गोष्ट आहे. हे भाग्य लाभण्यास पदरी फार मोठी पुण्याई लागते. हे उत्सव म्हणजे कोणाचे उत्सव? हे ऐतिहासिक सत्पुरूषांचे उत्सव होत नि यांची संख्या आमच्या राष्ट्रात जास्त आहे म्हणजे काय? तर इतक्या सत्पुरूषांनी आमचे राष्ट्र युक्त आहे असेच म्हणणे होय. इतक्या रत्नांनी ही आमची राष्ट्रदेवी भूषित आहे. तिच्या कंठामध्ये इतक्या कोहिनुरांची माळ आहे ही यथार्थ गर्वोक्ती करण्याचे नशिबी असणे म्हणजे सर्व पुण्याचा उत्कर्ष होय!!! आज काय शिवाजीचा उत्सव आहे, उद्या गुरूनानकांचा आहे, परवा नाना फडणीसाचा आहे, असे होता होता ज्या राष्ट्रात वर्षातील ३६५ दिवस सारखे सत्पुरुष-महोत्सव सुरू राहून शिवाय बाकी उरतातच, जेथे वर्षातील दिवस कमी पडतात पण सत्पुरूषांची

संख्या कमी पडत नाही त्या राष्ट्राच्या भाग्याशी कशाची तुलना करावी? क्षीरसागर, मेरू पर्वत नि पॅराडाअज् हे सर्व एकत्र झाले तरी त्या राष्ट्राच्या भाग्याचे पारडे त्यास हार जाणार नाही! ऐतिहासिक उत्सवात फार श्रम नि फार खर्च होतो हे म्हणणा-या मूर्ख नि अंध लोकांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी की, गोठा मोठा करावा लागेल म्हणून कोणी कामधेनूंना का हुसकून दिले आहे? नवी पेटी करावी लागेल म्हणून कोणी रत्नांना का झुगारून दिले आहे? श्रम नि खर्च होतो म्हणून कोणी ऐतिहासिक उत्सव का बंद केले आहेत? असल्या उत्सवांस ते दररोज कितीही करावे लागले तरी कोण कंटाळणार आहे? हे उत्सव म्हणजे मिल्टनने म्हटल्याप्रमाणे -

“Not harsh and crabbed as dull fools Suppose,

But musical as is Appollo’s lute

And a perpetual feast of nectared sweet,

When no crude surfeit reigns!!!”

तेव्हा ऐतिहासिक उत्सव परकीयांपासून घेतले आहेत. म्हणून किंवा त्या उत्सवांस आजचे रूप मिळाले आहे म्हणून ते उत्सवच नकोत असे म्हणणाऱ्या आक्षेपकांचा विचार झाला. रूपांसंबंधी जे प्रश्न आहेत त्यांचा एकाच प्रकारचा निकाल कधी लागणार नाही. त्यास उत्तर इतकेच की ज्या पक्षास जे रूप संमत असेल त्या रूपात त्यांनी तो उत्सव करावा. अखेर सद्रूपाचाच जय होउन सर्वजण त्याचेच रूप स्वीकारतील; पण रूपाशिवाय आणखीही असा एक ऐतिहासिक उत्सवापासून तोटा दाखविण्यात येतो की, केव्हा केव्हा त्या उत्सवापासून एकीचा भंग होण्याचा संभव असतो; श्रीशिवाजीच्या उत्सवापासून मुसलमानांना चीड येईल नि ते आपला पुरातन द्वेष पुन्हा माजवितील. पण असे होईल हे जरी गृहीत घेतले तरी यात शिवोत्सवाचा तो दोष काय? भारतधर्ममहापरिषद भरविल्याने नि तीत श्रीमच्छंकराचार्यांचा सन्मान केल्याने सर्व बुध्दधर्मीयांशी वैर होउन मंडनमिश्राच्या वंशजास वाईट वाटेल म्हणून ती धर्मपरिषद भरवू नये असे म्हणणे किंवा ऑस्ट्रियाला आपल्या तोंडातून इटली कसा हिसकावून घेतला याची आठवण होउन तो धायधाय रडू लागेल म्हणून ग्यारिबाल्डीचा उत्सव इटली देशाने करू नये असे बरळणे हे जितके वेडेपणाचे नि अविचारांचे होईल तितकेच किंबहुना त्याहून अधिक असंमजसपणाचे शिवोत्सवाने मुसलमान नाखूष होतात, सबब तो करू नये असे म्हणणे होणार आहे. जर मुसलमान नाखूषच होत असतील तर तो मुसलामानांचा अदूरदर्शीपणा होय. वामनपंडितांनी म्हटले

आहे, 'देखोनी परिपूर्ण सुधाकर सर्व सुखी परि चोर रडे।' शिवाय हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, जे समंजस नि सुशिक्षित मसुलमान आहेत ते वरील मूर्खपणास आपले बिलकुल अनुमोदन देत नाहीत. सारांश काय? ऐतिहासिक उत्सवांपासून हा तोटा होतो हे म्हणणे फोल आहे. खर्च जास्त लागत असेल तर तो कमी करा, समाज प्रथम दचकत असेल तर त्यास नीट समज द्या, पण ऐतिहासिक सत्पुरूषांचे उत्सव बंद करू नका. कृतज्ञताबुध्दीने मनात उध्दवणारा जो पूज्यभाव तोच ह्या उत्सव-पध्दतीत फलद्रूप झालेला असतो नि एवढयाचसाठी ते उत्सव न करणे म्हणजे कृतज्ञताबुध्दीचा खून करणे होय.

परंतु कृतज्ञतेसाठी नि फक्त कृतज्ञतेसाठीच हे उत्सव करावयाचे असे मात्र नाही. ज्याप्रमाणे सूर्य अमक्याचसाठी प्रकाशतो हे सांगता येणार नाही तद्वतच हे उत्सव अमक्याच एका फायद्यासाठी केले पाहिजेत हे विशेष रीतीने सांगता येणार नाही. सूर्य जगताला प्रकाश देण्यास्तव प्रकाशतो किंवा प्राणिमात्राला आवश्यक अशी उष्णता देण्यास्तव प्रकाशतो किंवा पंकजश्रीला हसविण्यासाठी प्रकाशतो, किंवा समुद्राचे खारे पाणी नेउन जगत्कल्याणास्तव ते गोडे करून मेघांकरवी परत धाडण्यासाठी प्रकाशतो का त्या मेघांनी 'धाराशरशतविकीर्णा' केलेली वसुमती पुन्हा 'हरिततृणसस्यां कुर्वती' करण्यासाठी प्रकाशतो!!! तद्वतच हे ऐतिहासिक उत्सव कशासाठी करावयाचे? हा कृतज्ञताबुध्दिस्तव करावयाचे, का सत्पुरूषांची स्मारके म्हणून करावयाचे; का नवीन पिढीला सद्गुणांचे हे उत्तम कित्ते होतील म्हणून करावयाचे, का दुष्कृत्यांचा अपजय कसा होतो नि सत्कृत्यांचा जय कसा होतो हे कळण्यासाठी करावयाचे, कां करावयाचे तरी कशासाठी? याला एकच एकच कार्य करण्यासाठी ते करावयाचे नसून ही सर्वच कार्ये करण्यासाठी ते करावयाचे आहेत. हा सूर्य अमक्याच कार्यासाठी प्रकाशत नसून तो या सर्वच कार्यासाठी प्रकाशतो.

ही सर्व कार्ये इतकी महत्त्वाची आहेत की, त्यांपैकी प्रत्येक कार्यासाठी अनेक अडचणी सोसूनही आम्ही हे उत्सव करावयास पाहिजे आहेत. ह्या ऐतिहासिक उत्सवांनी जगाचे स्वरूप कैक वेळा बदलले आहे! इतिहासाची पुस्तके ही फक्त सत्पुरूषांच्या कुडीची कल्पना देतात, पण हे ऐतिहासिक उत्सव ह्या कुडीत प्राणप्रतिष्ठा करून ह्या सत्पुरूषांस आपणापुढे मूर्तिमंत उभे करतात! त्यांचे सद्गुण आपणाला द्वश्य रीतीने दिसू लागतात नि प्रत्यक्ष त्यांच्या दर्शनापासून उत्पन्न होणा-या स्फूर्तीचा प्रेक्षकांच्या शरीरात संचार होउ लागतो! नवीन मुलगा इतिहास वाचू लागला असता शिवभूपाच्या वर्णनाने त्याचे अंतःकरण जितके वेधले जाईल त्याच्या शतपट रीतीने तो शिवोत्सवात दंग झाला असताना वेधले जाईल. सत्पुरूषांचे इतिहास हे सद्गुणांचे ठसे होत.

पण ते ठसे नूतन पिढीच्या मनःपटावर बरोबर रीतीने उमटविणारा ऐतिहासकि उत्सव हा कुशल छापणारा आहे. 'उत्सवप्रियाः खलु मानवाः' हा मानव जातीचा निसर्ग आहे नि मनोवृत्ती ह्या निसर्गजन्य आहेत, म्हणून त्या मनोवृत्तींना उद्दीपित करून जे सुशिक्षण या उत्सवांनी दिले जाते ते अतर साधनांनी इतक्या सोप्या नि इतक्या पूर्ण रीतीने कधीही देता येणार नाही! ऐतिहासिक उत्सवांत प्रेक्षकांना तुम्ही या विभूतीप्रमाणे वागा म्हणून सांगावे लागत नाही. त्या विभूतींचे तसल्या ठिकाणी दर्शन होण्याचा अवकाश की प्रत्येक अंतःकरणात दैविक शक्ती उत्पन्न झालीच पाहिजे नि त्या विभूतीच्या वैभवाचा परिणाम त्या व्यक्तीच्या हृदयावर घडलाच पाहिजे! त्यातही आपणा मूर्तिपूजक लोकांना तर याचा अनुभव पदोपदी घेता येणारा आहे! अन् जो अनुभव नि परिणाम व्यक्तीच्या हृदयावर घडतो तोच त्या व्यक्तींनी संभूत झालेल्या समाजावर घडलाच पाहिजे नि म्हणूनच कार्लाईल म्हणतो, "There is no better means than this identical heroworship to secure the existence and ensure the prosperity of a community. " तेव्हा ऐतिहासिक सत्पुरूषाचे उत्सव कां करावे? तर निसर्गजन्य कृतज्ञतेसाठी ते करावेत! त्या सत्पुरूषांनी जगावर जे अनंत उपकार केले आहेत त्यांचे स्मारक म्हणून करावेत! ते अनादिसिध्द परंपरेने चालत आलेले आहेत. म्हणून करावेत! ते उपदेशामृताचा वर्षाव करणारे मेघ आहेत; ती सद्गुणांची मूर्तिमंत स्वरूपे आहेत; मनोवृत्तींना उद्दीपन देणारी ती रसायने आहेत; तरूणांना सच्छिक्षण देणारे ते शिक्षक आहेत अन् सत्पुरूषांच्या कृत्यांचे ते जिवंत इतिहास आहेत; असे ते आहेत म्हणून ते करावेत. त्यांपासून खरोखर तोटे मुळीच नाहीत म्हणून ते करावेत !!! पण आम्ही हिंदू लोकांनी ते विशेषतः सांप्रतच्या स्वाभिमान नि कर्तव्यशून्यतेमुळे प्राप्त झालेली अवनत स्थिती जाउन उन्नतावस्था प्राप्त होण्यासाठी अवश्यमेव करावेत कराण राष्ट्रोन्नतीला हा एकच सोपा जिना आहे!!!

# ३. वन्दे मातरम्

भरतखंडाला स्वदेश म्हणण्याचे भाग्य परमेश्वराने कोणत्या लोकांच्या ललाटांना अलंकृत करण्यासाठी राखून ठेवले आहे? भरतभूमी मातृस्थानी मानण्याच्या पवित्र अधिकाराचा अभिषेक जगच्चालकाने कोणत्या लोकांवर केलेला आहे? अन् ह्या भक्तीच्या सुधाधवल स्तन्याचा दिव्य आस्वाद घेऊन नि तिला 'हे मातर्' 'हे आई' असे म्हणून कोणाच्या जिव्हा धन्य झाल्या आहेत? ती धन्यता केवळ आमच्या जिव्हांना लाभली आहे! भरतभूमीला मातृस्थानी मानण्याच्या अधिकाराचा अभिषेक एकटया आम्हा भारतीयांवरच जगच्चालकाने केला आहे! अन् भरतखंडाला 'स्वदेश' म्हणण्याच्या महद्भाग्याने आम्हा भारतीयांविना जगावरील कोणत्याही लोकांचे ललाट अलंकृत झालेले नाही! आम्ही सर्व हिंदी बांधव हे हिंदमातेची खरी लेकरे आहोत. हिंदमाता ही आमची जन्मदात्री आहे. हिंदमाता ही आमची परिपालयित्री आहे. तिच्या दुधावर आम्ही वाढलो आहोत. तिच्या दुधावर आमचे पूर्वज वाढले. तिच्या दुधावरच आमचे वंशज वाढणार आहेत. ही आमची भारतभूमी वात्सल्याची पुतळी आहे. ही आमची भारतभूमी मूर्तिमंत प्रेमलता आहे! ती वेदांत गाइल्याप्रमाणे 'पुराणी देवी युवतिः पुरंधी' आहे. ती अनुभवाने वृध्द आहे. ती सौदर्याने तरूण आहे. आम्हा तीस कोटी लोकांवर तिची समान ममता आहे. तीस कोटी कंठांतील 'वदे मातरम्' चा मंजुळ कलरव ऐकून तिला प्रेमाने भरते येते! अशा प्रेममयीला 'आई' म्हणण्याचे महद्भाग्य जिच्या प्रसादाने आम्हास लाभले आहे त्या पारलौकिक इच्छाशक्तीला नि आमच्या ह्या ऐहिक परमेश्वरी आर्यभूमातेला आमचा सदैव प्रणाम असो!

आर्य भूमातेच्या भाग्याची गणना कोण करू शकणार आहे? असितगिरिसमं स्यात् कज्जलं सिंधुपात्रे सुरतरूवशाखा लेखनी पत्रमुर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालम्' तथापि हे आर्यमाते, तुझ्या गुणांचा पार लागणार नाही! सर्व जगतीतलावर पसरलेल्या हजारो भूभागांमध्ये आर्यभूसारखी रमणीय भूमी दुसरी कोणती आहे, हे पाहण्यासाठी हिमालय पर्वत उठून उभा राहू लागला. त्याने आपले डोके सर्व विश्वातील भूप्रदेश दिसतील इतके अुंच केले. तरी त्याला इतकी रमणीयता अन्यत्र कोठेच आढळेना. भूलोकावर जिच्याइतकी रमणीयता नाही, तिच्यासमान स्वर्गलोकात तरी काही आहे की नाही म्हणून तो उत्साह पावलेला हिमालय स्वर्गाची कपाटे उघडून आत घुसला. परंतु तेथे हे आर्यभू, तुझ्याइतकी मंगलमय वस्तू सापडण्याऐवजी काही

निराळाच प्रकार झाला! या हिमालयाची ती हिमधवल सौध शिखरे पाहून अंद्राच्या अमरावतीतील अप्सरांची एकच त्रेधा उडाली! त्या सर्वजणी हिमालयाच्या गळयाला मिठया मारू लागल्या. अमरावतीचा त्याग करून तेव्हापासून त्या हिमालयावर स्वच्छंदाने विहार करीत असतात. ही बातमी पोचताच आश्चर्योत्सुक गिरीजेने गिरिजारमणासह आपले बिर्‍हाड त्या प्रासादसुंदर हिमनगरावरील कैलासात नेउन ठेवले! श्रीशंकराला जो आपल्या अस्तित्वाने पूत करावासा वाटला, त्या हिमालयाने हे आर्यभूमी तू युक्त आहेस! 'यं सर्वशैलाः परिकल्प्य वत्सं, मेरौ स्थिते दोग्धरि दोहदक्षे ।। भारस्वन्ति रत्नानि महौषधींच पृथूपदिष्टां दुदुहुर्धरित्रीम्' अशा त्या हिमालयाने हे आर्यभूमी , तू संपन्न आहेस! सूर्याशी प्रतिरोध करू इच्छिणार्‍या महानुभाव विंध्याद्रीने तू संपन्न आहेत! रायगड नि सिंहगड ह्या रत्नांनी ज्याचा कळस शोभिवंत झालेला आहे, त्या स्वतंत्रतेच्या देव्हार्‍याने-सह्याद्रीने-तू संपन्न आहेस! हिमालय, विंध्याद्री नि सह्याद्री ह्या प्रमुख नगवरांनी अधिष्ठित असलेल्या भूमातेला आमचा प्रणाम असो! मनुष्यापेक्षा देव श्रेष्ठ, देवांमध्ये महादेव श्रेष्ठ. परंतु त्या महादेवाच्या मस्तकावर आरूढ झालेल्या भागीरथीने, हे आर्यभू, तुला पुनीत केलेले आहे. सिंधू, शतद्रू, ब्रह्यपुत्रा नि यमुना ह्यांच्या रूपाने हे भूमाते, तू तुझ्या लाडक्या लेकरांसाठी स्वर्गीय पयःसुधेचे अखंडौघ सोडले आहेस. सिंधू नि ब्रह्यपुत्रा, गंगा नि यमुना, नर्मदा नि गोदा, कृष्णा नि कावेरी ह्या तरंगिणींनी संपन्न असलेल्या भूमातेला आमचा नमस्कार असो! ज्यावरील प्रफुल्ल कमलांविना लक्ष्मीला दुसरे निवासस्थान प्रिय नाही, जेथील हंस हे कनकारविंदे जेवतात नि 'मृदुलनालमृणालकंदा'चा फराळ करतात त्या मानससरोवरांनी हे आर्यभूमी, तू विभूषिता झाली आहेस! 'अदं तीर्थ समं सौम्यं सुतलं सूक्ष्मवालुकम्। रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा' अशा मानसप्रमुख सरोवरांनी मनोजम झालेल्या भूमातेला आमचे वंदन असो! सर्व जगाचे जहाज केले असता ते गच्च भरून जाईल इतके सोने नि इतकी रत्ने हे आर्यमाते, तू शेकडो भुयारांतून आमच्यासाठी जतन करून ठेविली आहेस. त्यावाचून कोहिनुरांनी भरलेली पेटी गोवळकोंडयाकडे आहे ती वेगळीच! अपरिमित सुवर्णाने सुशोभित असलेल्या 'सुवर्णभू'ला नि अनंत कोहिनुरांनी तेजोमय झालेल्या आर्यवसुंधरेला आमची प्रणती असो!

विशवमित्राला मोह पाडण्यास्तव मेनकेने ज्याच्या साहाय्याची याचना करावी असा तो वसंत ऋतू; वसुमतीला हिरवा शालू नेसविणारा तो वर्षाऋतू, ह्या ऋतुप्रमुखांनी जी ऋतुमनी आहे त्या आर्यभूला आमचे वंदन असो! पार्वतीच्या स्तनांप्रमाणे मधुर आम्रफलांच्या नि अप्सरांच्या अधरोष्ठप्रमाणे असणा-या सरसमृदुल द्राक्षांच्या लता ह्या बालकांच्या चिमुकल्या मुखात स्तन

पोचावे म्हणून वाकलेल्या युवतीप्रमाणे ज्या भूमीमध्ये किंचित् मात्र लवलेल्या आहेत, त्या आर्यभूमातेला आमचे वंदन असो!

ज्यांच्या कोमल कंठातून आपले नाव अुंच नि मधुर लकेऱ्यात गाअले जावे म्हणून श्रीरामचंद्रांनी यशःसंपादन केले अशा शुककोकिलांही ज्या भूमीमधील कल्पवृक्ष सप्तसुरांना आलापीत आहेत; त्या विविधविहंगमा भारतीला आमचे वंदन असो! जिला पाहून ब्रह्यदेवाने रंभेचे नाक कसे असावे हे ठरविले त्या चंपककलिकेने नि ज्याच्या प्रतिबिंबाने लक्ष्मीच्या गालंवर आपांडुर लाली आली आहे त्या गुलाब, मालती नि जाईजुईने जी सुगंधित झाली आहे, त्या विकसितकुसुमा भूमातेला आमचे वंदन असो. ह्या भारतीयांच्या विस्तीर्ण राष्ट्राला अत्यंत उच्च प्रकारच्या जीवनशक्ती जिच्या कृपेने आज सहस्रावधी वर्षे मिळत आहेत नि पुढे भविष्यकाल कायम आहे तोपर्यंत मिळतील त्या भूमातेला आमचे वंदन असो! जीमधील शेते ही नेहमी धान्याच्या मुठी भरलेले आपले हस्त उंच करून डुलत डुलत सर्व मनुष्यजातींचा योगक्षेम चालविण्यास आपण समर्थ आहोत असे यथार्थ स्वाभिमानाने दर्शवीत असतात, जीमध्ये भूमी सस्यशालिनी नि जीमध्ये जलाशय फुल्लारविंद असे असतात, जिच्या रथाच्या अश्वांच्या पाठी परमात्म्याच्या हाताच्या खराऱ्यानी पूत झालेल्या आहेत, जीमधील गाई नेहमी दुभत्या असतात, अशा त्या सुभगा भूदेवीला आमचे वंदन असो! चीन देशाच्या बादशहाने चीनची भिंत बांधून तो देश जास्त बळकट केल्याचा वृथा गर्व करू नये म्हणून जिला उत्तरेकडे स्वतः निसर्गदेवीने हिमालयाची अत्युच्च नि दुर्भेद्य भिंत उभवून दिली आहे नि जिला दक्षिण, पूर्व नि पश्चिम या दिशांनी समुद्राच्या विस्तीर्ण खंदक संरक्षण करीत आहे त्या आमच्या भूदेवीला आमचे वंदन असो! जिला उत्तरेकडून सर्व स्थलदेवता नि अतर दिशांनी जलदेवात संरक्षित आहेत त्या भूमातेतील सर्व क्षेत्रांना आमचे वंदन असो. अशा या आमच्या भारतमातेचा सर्वत्र जयजयकार असो!

जगती-तलावरील प्रत्येक देशाला निसर्गदेवतेने काही फायदे दिलेले असतात. एखाद्या देशात अुंच पर्वत असतात तर दुसऱ्यात एक ओळही नसते. एखाद्यात सोन्याच्या खाणी असतात, तर दुसऱ्यात कोळशाच्यादेखील नसतात. एखाद्या देशाला समुद्राचे पूर्ण रक्षण असते तर दुसऱ्याला समुद्राची कल्पनाही नसते. परंतु आपल्या भरतभूमीला कशाचीही ददात नसते. जे जे उत्तम आहे, जे जे उदात्त आहे, जे अभिलषणीय आहे नि जे जे अभीप्सित आहे ते ते सर्व या भारतात परमेश्वराने भरून ठेवले आहे! ही अतिशयोक्ती नाही. ही यथार्थोक्ती आहे. हिमालयासारखा पर्वत जगातील कोणत्या देशाजवळ आहे? कोहिनूर हिरा कोणती अन्य खाणी

प्रसवू शकणार आहे? गंगेसारखी नदी नि दुआबापेक्षा सुपीक भूमी आणखी किती देशांत आहे? हिमालयाहून अधिक बळकटपणे अन्य किती देश संरक्षित झालेले आहेत? जितक्या कोळशाच्या खाणी पुष्कळ, तितक्याच सोन्याच्या खाणी मुबलक. यांपैकी एकक गोष्टही कित्येक देशांच्या दैवी नसून आमच्या या भारतीय मात्र सर्व अद्‌वितीय वस्तूंनी संपन्नत्व आले आहे. उत्तम वस्तूंचे हे एक निसर्गनिर्मित पदार्थसंग्रहालय आहे. येथे नाही असे जगात काय आहे? उलट, जे जगात अन्यत्र कोठे नाही, ते मात्र या आमच्या मातृभूमीत परमेश्वराच्या कृपेने लाभलेले आहे. सारांश, अत्युच्च पर्वत, सखोल नद्‌या, सुपीक वसुंधरा, सुरस फले, सुवासिक फुले, सर्व धातूंच्या खाणी, विविध पक्षी, विस्तीर्ण समुद्र, सुंदर सरोवर अत्यादी जे जे म्हणून निसर्गदेवतेला देता येणे शक्य होते ते ते सर्व संपूर्ण रीतीने लाभल्यामुळे जिला अद्‌वितीय चारूता नि श्रीमंती प्राप्त झालेली आहे, त्या भगवती आर्य भूजननीला आमचे सदैव वंदन असो!

परंतु नुसत्या नैसर्गिक सौंदर्यानेच ह्या भरतखंडाचे गुणवर्णन झालेले नाही, तर नैसर्गिक सौंदर्य नि संपन्नता ह्या दोन गोष्टींत आमची भूमाता ही जगतीतलावर श्रेष्ठ आहे. इतकेच नव्हे, तर आपल्या आर्य भूमातेच्या गुणवर्णनाचा हा एक अंश आहे. तिच्या अनंत गुणसंचयातील तो एक लहानसा गुण आहे. कारण स्वाभविक सुंदरता असणे हा गुण निसर्गाच्या हाती असतो. स्वभावसुंदरता असणे ही पूर्वभाग्याची द्‌योतक असती तरी कर्तृत्वाची द्‌योतक नसते. गोरागोमटा चेहरा असूनही जर एखादा मनुष्य कर्तृत्वशालीही असेल तर तो ज्याचा फक्त चेहरा गोरा आहे परंतु कर्तुत्वाच्या नावाने शून्य आहे अशा करंटयाहून शतपट अधिक मानार्ह समजला पाहिजे. तेव्हा जरी परमेश्वराने सर्व स्वाभाविक चारूता या आर्यभारतीला अर्पण केली असली तरी तिच्या स्वतःच्या कर्तबगारीवरूनच पाहावयास पाहिजे. उत्तम नदी ती की, जी अत्यंत गोड नि विमल पाणी देते, उत्तम शेत ते की, जे धान्याच्या कणसांनी सदैव आंदोलन घेत असते नि उत्तम वृक्ष तोच की, ज्याची फळे अत्यंत मधुर नि रसाळ असतात; त्याचप्रमाणे उत्तम देश तो होय की, ज्याच्या पुत्रांच्या अंगी काहीतरी असामान्यता असते. देशभूमीची खरी चारूता तिच्या स्वतःच्या महत्त्वाने जितकी प्राप्त होते तिच्या शतपट अधिक रीतीने त्या देशभूच्या पुत्रांच्या कृतीवरून ठरत असते. ह्या वीरमातृत्वात जी भूमी सर्व जगात श्रेष्ठ ठरेल ती खरी श्रेष्ठ होय! ही कसोटी जर आर्य भूमातेला लावावयाची असेल तर आमची भूमाता वीर्यवान पुत्रांची जननी आहे हे सिध्द करण्यासाठी तिच्या वीर्यवान पुत्रांपैकी काहींचा जरी नामनिर्देश करू लागलो तरी हे चंद्रा नि सूर्या, तुमची तेजे फिकी पडू लागतील. कारण वीरमातृत्वात ही भूमी मृत्युलोकातच काय, पण

सूर्यलोकात नि चंद्रलोकात श्रेष्ठ ठरविली जाईल. इंग्लंड, अमेरिका, जपान, चीन, वगैरे अर्भकांबरोबर तुलना करणे यात काहीच अर्थ नाही. ज्या वेळेस रोमचे नाव ऐकू येत नव्हते नि ग्रीस देशात वस्तीही झाली नव्हीती तेव्हा ही आर्यभूमी वीरप्रसवा नि मानवी समाजाची अधिदेवता होती. अजिप्त, खाल्डिया नि असीरिया यांच्याही कित्येक शतके आधी आमच्या अकडे मानवी जातीची उत्क्रांती तत्त्वांच्या नि दर्शनांच्या सूत्रीकरणापर्यंत आलेली होती. जगातील कित्येक भाषांत ५००-६०० शब्दांचा भरण नव्हता, त्या वेळेस ह्या भारतातील ऋषिवरांनी संस्कृत भाषेला संस्कृत करून तिला सूक्ष्म विचारप्रदर्शनात प्रवीण केले होते. इतकेच नव्हे, तर तिला छंदात बध्द करून तालसुरांवर लीलानर्तन करण्याला लावले होते. जेथे इतिहासाचा प्रदीप प्रवेश करू धजत नाही किंवा जेथे दंतकथेचे तीव्र टोकही बोथट होत आहे, अशा सहस्रावधी वर्षापूर्वीच्या कालातूनही ज्या भूमीमध्ये वेदघोष ऐकू येत आहे, त्या भूमीच्या भाग्याची तुलना कोणाशी करता येणार आहे? सर्व जगात अत्यंत जुना असा ऋग्वेद ह्या भूमीमध्ये निर्माण झाला. तत्त्वज्ञानाला १० हजार वर्षापूर्वी शोधून काढणारे वीर्यवान ऋषी जगावर अतरत कोठे आढळणार आहेत? त्या ऋषींच्या तपोवनांनी नि त्यांच्या तपांनी पूत झालेल्या भूमातेला आमचे वंदन असो! वशिष्ठ-वामदेवांनी अभिमंत्रित असलेल्या जलांच्या सिंचनाने ही पुनीत झालेली आहे. होमहवनांच्या पुण्यसमयी देव-देवतांचा संतोष अग्नीच्या दक्षिणार्ची ज्वालांनी ह्या भूमीत व्यक्त झालेला आहे होमामध्ये दग्ध होणा-या घृताच्या सुवासाने दुरून स्वर्गातील इंद्र नि वरूण या भूमीवर अवतरत असत. वीर्यवान नि ब्रह्यवेत्ते ऋषींच्या समिती या भूमीवर तत्त्वज्ञानाचा वाद-विवाद करीत असताना आपले आजपर्यंतच्या गौप्याचे आता स्फोटने होते की काय म्हणून परब्रह्याला काळजी वाटे!

ऋग्वेद या भूमीचा आहे! अथर्ववेद या भूमीचा आहे. यजुर्वेद या भूमीचा आहे. सामवेद या भूमीचा आहे. ब्राह्यणे नि उपनिषदे या भूमीची आहेत! तत्त्वज्ञानाची भागीरथी या भूमीच्या चरणकमलापासून उगम पावली आहे. शुक नि वसिष्ठादिक परब्रह्यवेत्ते ब्राह्यण याच भूमीत निर्माण झाले होते! अंगीरस, वसिष्ठ वामदेव, याज्ञवल्क्य, भृगू ही विभूतिमान नावे ऐकताच कोणाच्या मनास एकदम उदात्तता प्राप्त होत नाही? असे हे तत्त्ववेत्ते ज्या भूमीच्या कुसुव्याला धन्य करीत आहेत त्या तत्त्ववेत्त्या भूमीला आमचे वंदन असो!!! न्यायशास्त्राचे प्रणेते नि सांख्याशास्त्राचे प्रणेते ह्याच भूमीच्या अन्नावर वाढले! बुध्दीवर अंधश्रध्देचा पगडा पडू लागताच जया कपिल महानुनींनी अंधपरंपरेला झुगारून देउन विचारशक्तीचा पहिला जयजयकार केला ते सांख्यशास्त्रप्रणेते कपिल महामुनीदेखील आपल्या ह्या भारतीला 'हे मातर्' म्हणून वंदन करीत

असत! सर्व जगाला अजून वंद्य असलेल्या कपिल महामुनींनी जिला 'आई' म्हणून वंदन करावे अशी भूमी ह्या जगावर किंवा चंद्र, मंगळ, बुधादी ग्रहहो, तुमच्याकडे तरी एखादी आहे काय? भास्कराचार्यांनी, आर्यभट्टांनी नि वराहमिहिरांनी भूगोलाचे, ज्योतिषशास्त्राचे नि गणितशास्त्राचे शोध ह्या भूमीतील अन्नसेवनाने आलेल्या तीव्रतेने लावले. दशांशाचा शोध ह्या भूमीचा आहे. गुरूत्वाकर्षणाचा शोध ह्या भूमीचा आहे. भूमिती ह्या भूमीत जन्मास आली, त्रिकोणमिती (Trigonometry) ह्या भूमीतील यज्ञवेदीतून उत्पन्न झाली. सप्तसुरांचा उदय ह्या भूमीच्या कोमल कंठातून झाला. मत्स्ययंत्र (होकायंत्र) ह्या भूमीत जन्मास आले. जगात व्याकरणशास्त्राची पध्दती ह्या भूमीने दिली. पहिली सशास्त्र लिपी नि वर्णमाला ह्या भूमीत निर्माण झाली. मयसभेला उत्पन्न करणारे शिल्पशास्त्र ह्या भूमीत उत्पन्न झाले. कणाद, कपिल, भास्कर, आर्यभट्ट, वराहमिहिर, भरत, पाणिनी, विश्वकर्मा, वाग्भट, गौतम असल्या तेजोभास्करांना-ह्या स्वतंत्र शास्त्रप्रणेत्यांना- उत्पन्न करण्याइतके ज्या भूमीचे अन्न वीर्यवान आहे त्या शास्त्रविद भूमीला आमचे सदैव वंदन आहे!!!

परंतु हे तत्त्ववेत्ते हो नि शास्त्रप्रणेते हो! सर्व जगाला ललामभूत झालेले असे तुम्हीच काय ते ह्या भूमीत उत्पन्न झालेले आहात असा वृथा गर्व वाहू नका! वाल्मिकीच्या 'सरसा सालंकारा सुपदन्यासा, सुवर्णमय' मूर्तीला ह्या स्वर्ग-मृत्यू-पातालात कोण भुलत नाही? रामायणाइतके सरस असे ह्या जगावर कोणते काव्य आहे? तरी अप्सरांच्या अधरोष्ठांनी नि द्राक्षांच्या लतांनी त्या रामायणातील रस कितीदा तरी चोखून नेलेला आहे! 'पाराशर्यवयः सरोजममल गीतार्थगंधोत्कटम्। नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् । लोके सज्जन षट्पदैरहरहः पेपीयमांन मुद्र'। अशा प्रकारचे 'भारत' रचणारा व्यास भरतभूमीशिवाय अतर कोठे जन्माला येणार आहे? जगावरील सर्व शास्त्रे बुडाली नि 'भारत'च काय ते राहिले तरी सर्व शास्त्रांची आठवण होउ देणार नाही ते 'भारत' या भूमीचे आहे. तुम्हाला काय पाहिजे आहे? नीतिशास्त्र पाहिजे आहे? भारताकडे वळा! तत्त्वज्ञान पाहिजे आहे? भारतसुधामाधुरीकडे वळा. इतिहास, सृष्टिवर्णन, काय पाहिजे आहे? 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' अशा ज्याच्या कीर्तीची, संघशक्तीची नौबत झडत आहे, त्या व्यासाला जन्म ह्या आर्यभूमीने दिला. रामायण आमचे आहे. महाभारत आमचे आहे. शाकुंतल आमचे आहे. आता भारतभूमी सोडून क्षीरसागराला कोण जातो! रामायण हा आमचा क्षीरसागर, भारत हा आमचा दुसरा क्षीरसागर, शाकुंतल आमचा तिसरा क्षीरसागर नि उत्तर रामचरित्र हा आमचा चौथा क्षीरसागर. इतक्या क्षीरासागरांपुढे त्या एकाची

काय किंमत आहे! एका क्षीरसागरात राहणाऱ्या त्या लक्ष्मीकांताहून आम्ही भारतभूमीच रहिवासी चौपंट भाग्यशाली आहोत. आमच्या कवितेत लक्ष्मी आहे, पण त्याच्या लक्षीमत कविता कुठे आहे? या कवितेचे कांत वाल्मिकी, व्यास, कालिदास नि भवभूती ह्या सर्वांना ज्या भूमीकडून दिव्य प्रतिभास्फूर्ती झाली, त्या भूमीला आमचे वंदन असो!!! प्रंतु ही प्रतिभास्फूर्ती काव्यातच झाली असे नाही. मानवी समाजाला धर्मतत्त्वांनी जर काही फायदा झाला असेल, तर त्याचे सर्व श्रेय आमच्या या आर्यभूमीला आहे. जगताची सर्व धर्मपरंपरा येथून उद्भूत झालेली आहे. वेदप्रणीत धर्माची ती सर्व लेकरे आहेत. हिंदू धर्मापासून महात्म्या बुध्दाने बुध्द धर्म प्रतिपादन केला. त्या बुध्द धर्माची एक प्रत उतरून घेऊन जीजसने ख्रिस्ती धर्म तयार केला. त्यात तलवारीचे पाणी ओतून महंमदी धर्म झाला नि त्या महमदी धर्माचा ओघ नानकाने पुन्हा मूळ आर्य धर्माशी आणून भिडविला. धर्म हा जर तुमचा प्राण असेल नि जर तुम्ही धर्मच्युत झालेले नसाल, तर हे जगतावरील सर्व समाजांनो, तुम्हाला तुमचा तो प्राण दिल्याबद्दल ह्या भूमीला प्राणच आहे. त्याच्या रक्षणार्थ देह कष्टविणारे शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य वगैरे सर्व धर्मवीर आमच्या भूमीत जन्माला आलेले आहेत. वीर्यशाली जपाना, ज्या भाग्याकरिता तू आणखी दहा सुशिमाच्या लढाया जिंकल्यास तरी तुला जे लाभणार नाही, असले बुध्द महर्षींना जन्म देण्याचे भाग्य या आमच्या आर्य वंसुधरेला आहे! इतकेही असून अमक्यांनी अमक्याच मार्गाने परमेश्वराकडे जावे असा ह्या उदारचरितेचा बिलकूल आग्रह नाही. तिच्या मुलांपैकी काहीजण देवाला विष्णू म्हणून म्हणोत! कोणी नानकास धर्मप्रणेता म्हणोत, किंवा कोणी बुध्दाला म्हणोत. असल्या गोष्टीत त्या मातेचा आपल्या कोणत्याही मुलावर अनुदारपणाचा दाब नाही. तिच्या तीस कोटी लेकरांतील हिंदू जितके तिला प्रिय आहेत, तितकेच बौध्द आहेत, तितकेच जैन आहेत. निसर्गाने जिला सर्व जगतात अत्यंत सुंदर केली आहे तीच ही भारतमाता आपल्या वीर्यवान प्रसवांनीही सर्व जगात श्रेष्ठ आहे. ही स्तुती काव्याच्या भाषेत केलेली नाही. ही स्तुती यथार्थ आहे हे दाखविण्यासाठी वर ऐतिहासिक भाषाच वापरली आहे. पौराणिक नि दंतकथायुक्त अशा माहितीला जर क्षणभर बाजूला ठेवले तरी वर वर्णन केलेल्या ऐतिहासिक व्यक्तीपैंकी एकेकाची योग्यता अशी आहे की, तसल्या एकेका व्यक्तीला जन्म देताच अतर भूमी निःसत्व होउन गेल्या असत्या! परंतु आज सतत अनंत वर्षे अनंत वीरांनी वीरप्रसवा झालेल्या सत्त्वमती भारतीला आमचे वंदन असो! प्रंतु मातृभूमी नुसती सत्पुत्रांना उत्पन्न करीत नाही. ह्या भाग्यशाली भूमीला पोटी जशी नि जितकी नररत्ने आलेली आहेत, तशीच नि तितकीच स्त्रीरत्नेही येथे पैदा झाली आहेत. तिच्यामध्ये ऋषिवृंदांना भरसभेत ब्रह्याविचारात जिंकून टाकणारी गार्गेयी जन्मास आलेली

आहे; ह्या भूमीमध्ये लोपामुद्रा जन्माला आलेली आहे! ह्या भूमीत तारा जन्माला आलेली आहे! या भूमीत मंदोदरी जन्माला आलेली आहे! नि ह्याच भूमीत दमयंती जन्माला आलेली आहे! नि ह्याच भूमीत सावित्री जन्माला आलेली आहे. भूदेवीच्या मुलीही मुलांइतक्याच पावन आहेत. याच्यासाठी आणखी किती नावे द्यावीत! तथापि अजून कोणाची खात्री होत नाही काय? नसेल तर ऐका! आम्ही एकच पवित्र नाव सांगतो ते ऐका. सद्‌गुण, औदार्य, धाडस, पातिव्रत्य, सदयता, निसर्गगंभीरता नि दिव्य सुंदरता ह्या सर्व सद्‌गुणांना ज्या एका नावाने संबोधिता येईल असे आम्ही आता एक नाव सांगतो ते ऐका! ज्या नामोच्चारणाने आम्ही नि आमचा देश हे सदैव पावन होतील असे आता एक नाव सांगतो ते ऐका. हे जगावरील सर्व प्राणिमात्रहो नि स्वर्गातील सर्व देवहो, ते नाव श्रीसीतादेवीचे होय! सीतादेवी ही भूमीच्या उदरी पैदा झाली. ज्या भूमीच्या उदरी श्रीजानकी पैदा झाली, त्या भूमीच्या उदरी आमचाही जन्म झाला आहे ही कल्पना मनात प्रवेश करताच ते आकाशाहूनही विस्तृत होते! जे क्षेत्र उत्तम धान्य देते ते श्रेष्ठ, तसेच जो देश उत्तम स्त्रीपुरूषांना प्रसवतो तो श्रेष्ठ आहे असे समजून आपण ह्या भारतात श्रेष्ठत्व पाहू लागलो तो काय आढळले? अंगीरस, गर्ग, वसिष्ठ, वामदेव, याज्ञवल्क्य, जनक अत्यादी महातत्त्ववेत्ते; कणाद, कपिल, भास्कर, आर्यभट्ट वराहमिहिर, भरत, पाणिनी, वाग्भट, चरक अत्यादी शास्त्रवेत्ते; व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूती अत्यादी कवितादेवीचे लाल; गौतमबुध्द, शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, गुरूनानक अत्यादी धर्मसंस्थापक; श्रीराम, नल, युधिष्ठिर यांसारखे रंजनशील राजे; अर्जुन, श्रीकृष्ण नि कर्णादीकरून अतिरथी, महारथी; चंद्रगुप्त, शालिवाहन, अशोक, विक्रमाजित् वगैरे साम्राज्यसंस्थापक; शुकाचार्य नि हरिश्वंद्र ह्यांच्यासारखे मूर्त सद्‌गुणी; गार्गेयी, लोपामुद्रा, आहिल्या, तारा, मंदोदरी, सावित्री नि सीता अत्यादी युवती! प्रा भाग्याची गणना आता कशी करावी? ह्या विभूतींचे हे नामोच्चारण नुसते मासल्यासाठी म्हणून केलेले आहे! तरी हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास उपलब्ध नाही. जो आहे तो व्यवस्थित रीतीने संकलित केलेला नाही नि जो संकलित आहे तो सबंध आकलन करण्याची ग्रहणशक्ती नाही! भारतमहोदधीच्या उदराशी जाउन त्यातील हे चोचीभर पाणी ह्या टिटवीने आणले आहे. परंतु इतक्यानेच काय झाले आहे? केलले वर्णन तर आमच्या इतिहासाचा पूर्वार्धच आहे! आधुनिक कालातील रत्नांची यादी तर अजून अलाहिदाच आहे. चितूरचे प्रतापसिंह, बुंदेलखंडाचे छत्रसाल, बंगालचे प्रतापादित्य, रायगडचे हिंदुपदपादशाहा, पुण्याचे शनिवारवाडयाचे मालक, ग्वाल्हेरचे महादजी, पानिपतचे मैदान, सिंहगडची दरड, रांगण्याची खिंड, ज्ञानेश्वराची लेखणी, विठोबाचा भ७, समर्थांचे दास, किती सांगावे, कसे सांगावेद्‌य कोठवर सांगावे? योध्दयांची यादी द्‌यावी, का

कवींची द्यावी, का देशभक्तांची द्यावी, का स्वातंत्र्यवीरांची द्यावी, का मुत्सद्दयांची द्यावी? हे आर्यवंसुधरे, तू सुभग आहेस, सुजला आहेस, सुवर्णा आहेस, सुरत्ना आहेस. तुला आमचे वंदन असो. हे ऋतुमती, वसुमती, सुलते नि सुफलिते, तुला आमचे वंदन असो! हे विविध विहंगमे, विविधकुसुमे, तुला आमचे वंदन असो! हे निसर्गरम्ये नि निसर्गरक्षिते तुला आमचे वंदन असो! हे पुराणीदेवी युवती, पुरंध्री तुला आमचे वंदन असो! हे तत्त्वज्ञे नि शास्त्रज्ञे तुला आमचे वंदन असो! ळे प्रभामयो नि धर्ममयी तुला आमचे वंदन असो! हे सत्त्वमती नि वीर्यवती, तुला आमचे वंदन असो. हे स्वातंत्र्यातिलकभूषिते, तुला आमचे वंदन असो! श्रीशंकरादी त्रिदश देव जिचे रक्षण करताहेत, त्या तुला आमचे वंदन असो! नरद, तुंबर, व्यास, वाल्मिकी तुझ्याभोवती तुझी स्तोत्रे गात आहेत. तुला आमचे वंदन असो! श्री शिवप्रतापादी तुझ्या शत्रूंच्या नरडीचा घोट घेत आहेत, त्या तुला आमचे वंदन असो!!

वंदे मातरम्! वंदे मातरम्! वंदे मातरम्!!!

-बिहारी, चैत्र शु. २, शके १८२८

# ४. बाजीरावाची पुण्यतिथी!

वसईस चला!!

सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख ।।

श्रीमंत बाजीराव पेशवे यांची पुण्यतिथी ह्या वर्षी महाराष्ट्रात ब-याच ठिकाणी मानण्यात येउन त्या हिंदू वीराच्या पराक्रमाचे संकीर्तन केले गेले ते ठीकच झाले. महाराष्ट्राबाहेरही दिल्ली,आहेत. परंतु ज्या महाराष्ट्रसेनानीने आपल्या बालवयात आपल्या बालकोषातून, लहानग्या म्यानातून, कर्माची तलवार जी बाहेर काढली, ती केवळ एका मृत्युच्या म्यानातच परत आत घातली, त्या कर्मवीराची पुण्यतिथी ही निष्फळ वाचाळतेनेच जर सार्थ झाली असे समजावयाचे असेल, जर बाजीराव असे होते नि तसे होते या गप्पा झोडण्यातच सर्व दिवस गमावून लहान असो वा मोठे असो, परंतु त्या वीराच्या इच्छा तृप्त करण्यासारखे कोणतेही कृत्य जर करावयाचे नसेल, तर त्या महान कर्मवीराचा मी वंशज आहे असे म्हणण्यास महाराष्ट्राचा अधिकार महाराष्ट्राने गमावला असेच म्हणावे लागेल.

केवळ वडिलांची कीर्ती सांगूनच जो आळशी नि अकर्मण्य मनुष्य आपणास धन्य मानून घेतो तो खरोखरच एक मूर्ख होय. खरोखरच पुण्यतिथीच्या काय वा जन्मतिथीच्या काय, नुसत्या ह्या वाचाळ समारंभाचा, या नाटकांचा, या नुसत्या सव्यापसव्यांचा आता आम्हास अगदी तिटकारा आला पाहिजे. बाजीरावांची पुण्यतिथी साजरी करावयाची आहे ना? तर मग एक कणभर का होईना, पण काम करून दाखवा! बाजीरावाची पुण्यतिथी साजरी करावयाची आहे ना, तर मग वसईस चला नि या वर्षाच्या आत पोर्तुगिजांच्या कालात त्यांच्या बलात्काराने नि आपल्या गबाळपणाने जे हजारो महाराष्ट्रीय हिंदू आपल्या धर्मास नि संस्कृतीस आचवून ख्रिश्चन झाले, त्यांस शुध्द करून पुनरपि आपल्या या हिंदुत्वाच्या पैतृक माहेरास परत आणण्याची भव्य नि सबळ अशी महान चळवळ उडवून द्या.

कारण बाजीरावांच्या पिढीच्या पराक्रमाने पोर्तुगिजांपासून वसई परत मिळविली; परंतु तिच्या अंगावर लागलेले जातिच्छेदाचे, धर्मग्लानीचे नि संस्कृतिभंगाचे खोल धाव ती पिढी भरून काढू शकली नाही. ते कार्य जर आपली पिढी करील, तर त्या वीरांच्या अनेक अच्छांपैकी निदान एक तरी इच्छा पुरी होउन, या पुण्यतिथीस त्याचा आत्मा काहीतरी संतोष पावेल. त्याच्या

अतर महान इच्छा, त्यांनी साधलेली नि घडवून आणलेली परंतु आता पुन्हा बिघडलेली महत्कार्ये कोणी करू शकत असेल, तर शुभस्य शीघ्र! परंतु जर ज्यांना ती अतर महत्कार्य करवत नाहीत, तर त्यांनी तरी हे एक शक्य असलेले परंतु अंती तितकेच महत्फलदायी ठरणारे कार्य तरी या पुण्यतिथीच्या निमित्ताने करून दाखवावे. इतकेही जर आपल्या हातून होणार नाही, तर बाजीरावाची पुण्यतिथी आम्ही केल्यापेक्षा केली नसती तर बरे झाले असते, असे त्या महावीरास वाटल्याविना खचित राहणार नाही.

वसई, ठाणे, माहीम अत्यादी भागांतून हजारो ख्रिश्चन झालेले परंतु मनापासून आपल्या पूर्वजपूजित हिंदू धर्मासच चिकटून राहिलेले आपले महाराष्ट्राच्या रक्तचे, बीजाचे, भाषेचे बंधू वसईत आहेत हे अनेकांस माहीत आहेच. केवळ आपण त्यांना आपल्या घरांत घेत नाही म्हणून ते परक्या घरांत डांबून राखले जात आहेत. त्यांच्याप्रमाणेच त्या प्रांतातील हिंदू मात्र बाटवून ख्रिस्ती करावा अशी पोर्तुगिजांची प्रचंड खटपट चाललेली होती. हिंदू संस्कार नि हिंदू पूजा ही शासनाने बंद नि निषिद्व केली होती. ते शासन भंगण्यासाठी शेकडो हिंदू हुतात्म्यांना ठार करण्यात येत होते नि थोडयाच दिवसांत तो प्रांतच्या प्रांत निहिंदू झालाही असता जर का श्रीमंत बाजीरावांची पिढी वसईवर चढून जाउन, रोखून रेटून त्या किल्ल्यास वेढा देउन बसती ना; ‘माझे शिर तरी आत पडू दे’ म्हणून गर्जणा-या हट्टी शौर्याने पोर्तुगिजांची सत्ता पादाक्रांत करती ना. पण बाजीरावाच्या पिढीने वसई घेतली नि ‘कोकणात हिंदू धर्म राखला,’ परंतु पोर्तुगिजांची तरवार तोडून तिला हिंदुत्वावर अधिक घाव घालणे अशक्य करण्याचे कार्य जरी बाजीरावाची वीर पिढी करू शकली तरी लागलेले घाव भरून काढण्याचे, परक्यांच्या गोटात गेलेल्या हिंदूंस सोडवून पुन्हा परत घरी आणण्याचे कार्य करण्यास त्यांस समय सापडला नाही. ते कार्य आपल्या पिढीने केले असता बाजीरावाची एक इच्छा तरी पूर्ण होणारी आहे. तीही पूर्ण न करणे, हे शक्य असलेले कामही हाती न घेणे नि बाजीरावाच्या पुण्यतिथीच्या गप्पा मारणे म्हणजे त्या वीर पुरूषाच्या स्मृतीची केवळ अप्रतिष्ठा करणे होय. म्हणून वसईकडे ढाला फिरवा. महाराष्ट्रातील सर्व हिंदू सभांचा या वर्षाचा हा मुख्य कार्यक्रम असला पाहिजे. त्वरित ज्या त्या सभेने इतरांची वाट न पाहता वसईस प्रचारक पाठवून द्यावे. या यःत्किंचित कामासही हजार निमित्ते काढून लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ती आता पुरे झाली. उत्तरेस मलकाना रजपुतांच्या मुसलमान झालेल्या साठ हजार माणसांना आर्य समाजाने परत हिंदू करून घेतले. काय महाराष्ट्रास स्वतःच्या रक्तच्या नि जवळ

जवळ हिंदूच असलेल्या आपल्या वसईच्या पतित हिंदूंस शुध्द करण्याअतकाही आटोप उरला नाही? काय आर्यसमाजास जे शक्य झाले ते महाराष्ट्रास अशक्य व्हावे?

आणि कोणती गोष्ट शक्य किंवा अशक्य हे केव्हा ठरणार? ती करण्याचा काहीतरी प्रयत्न केल्यावर ना? का दुपारी चापून जेवून आरामखुर्चीवर पडले असता, अडचणीच्यांवर अडचणीचे मजले जी शिथिल कल्पना बसल्याबसल्याच उभारते तिच्या सांगण्यावरून? वसईचे हजारो हिंदू बंधू परत स्वधर्मात येणे अशक्य आहे, अकाली आहे हे तेव्हाच सिध्द होईल की, जेव्हा महाराष्ट्रीय प्रचारकांच्या सेना चिमाजी अप्पांच्या सेनेसारख्या सर्व दिशांनी उठून ठाणे, माहीम घेत घेत गोमांतकाचे सीमेत घुसतील नि माझे शिर तरी किल्ल्यात पडू दे म्हणून गर्जणाऱ्या चिकाटीने निदान एक वर्षभर तरी वसईस झुंजत राहतील! अजून एक प्रचारकही तिकडे गेला नाही. तिकडच्या हिंदू संघटनेच्या पुरस्कर्त्यांनी अजून इकडची काडी तिकडे केली नाही; तोच बसल्या बसल्या हे अशक्य, ते अशक्य ह्याची वेळ आली नाही, त्याची इतकी घाई कां, म्हणून बरळत बसण्याचा आपणांस काय अधिकार आहे? वेळ आली नाही? ती आणण्याचा बाजीरावी प्रयत्न केल्यावरही जर वेळ आली नाही, तर म्हणावे वेळ आली नाही! निजलेल्या सिंहाच्याही तोंडात पशू आपण होउन प्रवेश करीत नाही! ‘न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः

- लोकमान्य, ७-६-१९२५